# University of Mumbai

पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष,
परीक्षा विभाग,
छत्रपती शिवाजी महाराज भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पुर्व),
मुंबई - ४०० ०९८.

क्र. परीक्षा / पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष/ ४१३ /२०२३

परिपत्रक :-

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित/स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण परिक्षेत्राचे समन्वयक/संचालक आपणा सर्वांना कळविण्यात येते की, प्रथम सत्र २०२३ मध्ये विद्यापीठाने घेतलेल्या खालील नमुद अभ्यासक्रमाच्या परीक्षांसाठीचे पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रतीसाठींचे अर्ज व यासाठीचे विहित शुल्क Online पद्धतीने विद्यापीठाच्या www.mu.ac.in या अधिकृत संकेत स्थळावरून घेण्यात येणार आहेत.

1) T.Y.B.A. (Sem-V & VI) (Choice Based)
2) T.Y.B.A. (Idol) (Sem-V & VI)
3) T.Y.B.Sc. (Sem-V & VI) (Choice Based)
4) T.Y.B.Sc. (I.T.) (Sem-V & VI) (Choice Based) & (Idol)
5) T.Y.B.Sc. (COMP. SCI.) (Sem-V & VI) (Choice Based)
6) T.Y.B.Sc. (BIO-TECH.) (Sem-V & VI) (Choice Based)
7) T.Y.B.Sc. (HOSP. STUD.) (Sem-V & VI) (Choice Based)
8) T.Y.B.Com. (Idol) (Sem-V & VI) & (Yearly Pattern)
9) T.Y.B.Com. (Sem-V & VI) (Choice Based)
10) T.Y.B.Com. (Accounting & Finance), (Banking Insurance) & (Financial Markets) (Sem-V & VI) (Choice Based)
11) B.M.S. (Sem-V & VI) (Choice Based)
12) B.A. in Multimedia Mass Communication (Sem-V & VI) (Choice Based)
13) M.M.S. (Sem-III & IV) (Choice Based)
14) B.Ed. (Choice Based) (Sem-IV)
15) LL.B. (3 Year Course) (Sem-V/VI) (60:40)
16) B.L.S./LL.B. (5 Year Course) (Sem-IX/X) (60:40)
17) M.A. M.Sc. and M.Com. (Sem- I to IV) (Choice Based)
18) M.A., M.Sc. and M.Com. (Idol) (I, II, III & IV)
19) B.E. (Sem- VIII) C SCHEME (CBCS)
20) B.Arch. (Sem-VI) (CBSGS)
21) B.Pharm. (Sem-VII & VIII) (Choice Based)
22) M.C.A. (Sem- I to V) (Choice Based/CBSGS/BRIDGE COURSE)
23) M.C.A. (Idol) (Sem- I to V) (Rev/CBCS)



Scanned with OKEN Scanner

**Path for Online Application:-**
www.mu.ac.in → Examination → Application for Revaluation / Photocopy

**Read the instructions carefully and proceed for filling the form.**

- शुल्क भरल्यानंतर Send Anyway बटन वर क्लिक करणे.
- पोचपावती (Acknowledgement) आपणांस प्राप्त झाल्याशिवाय अर्ज भरल्याची खातरजमा (Confirm) होणार नाही.
- अर्ज भरताना शुल्क भरणा तसेच अन्य कोणत्याही अडचणी आल्यास, आपण आपल्या परीक्षेच्या लिंक बंद होण्याच्या दिनांकापुर्वी कृपया खालील दिलेल्या पत्त्यावर **स. ११.०० ते दु. ३.०० या कालावधीत** संपर्क साधावा.
- पत्ता :- उपकुलसचिव, पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष, छत्रपती शिवाजी महाराज भवन, पहिला मजला, कलिना, सांताक्रुझ (पु), मुंबई – ४०० ०९८.

उपरोक्त लिंक संबंधित परीक्षेचा निकाल जाहिर झाल्यानंतर पुढील सात दिवसाच्या आत सुरू करण्यात येईल व लिंक सुरू झाल्यापासून पुढील बारा दिवसांपर्यंत ही लिंक सुरू राहिल, तरी या कालावधीत वरील प्रमाणे कार्यवाही करावी.

वरील अभ्यासक्रमांमध्ये T.Y.B.Sc. (Sem-V & VI)(Choice Based) व T.Y.B.Com. (Sem-V & VI) (Choice Based) या मधील ज्या विषयांची (Applied Componants) परीक्षा विद्यापीठाच्या वतीने संबंधित महाविद्यालयांनी घेतलेली आहे या विषयांसाठीचे पुनर्मुल्यांकनाकरिताचे अर्ज संबंधित परीक्षांचे निकाल जाहिर झाल्यापासून पुढील २० दिवसांच्या आत **सॉफ्ट कॉपी (As per University format on Excel Sheet in Pen Drive) व हार्ड कॉपी (पारंपरिक अर्ज) स्वरूपात परिपुर्णरित्या भरून संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या सहीशिक्क्यानिशी विहित शुल्कासह परीक्षा विभागातील पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष, छत्रपती शिवाजी महाराज भवन, पहिला मजला, येथे स. ११.०० ते दु. ३.०० या वेळेत हस्तेपोच सादर करावेत ही विनंती.** तसेच या विषयांच्या छायांकित प्रती महाविद्यालयाने आपल्या पातळीवर विद्यार्थ्यांच्या मागणीप्रमाणे पुरवाव्यात.

विद्यापीठाकडे पुनर्मुल्यांकनासाठी वरीलप्रमाणे अर्ज पाठविताना अर्ज परिपुर्णरित्या व अचूक भरलेले आहे याची खात्री करून घ्यावी. अर्ज अपुर्ण भरलेला तसेच अर्जात चूकीची माहिती असल्यास व यामुळे भविष्यात कोणत्याही बाबी उद्‌भवल्यास त्यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील.

**अर्ज स्वीकारण्याची वरील मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत अर्ज स्विकारले जाणार नाहीत.**

वरीलप्रमाणे विद्यापीठाच्यावतीने महाविद्यालयांनी घेतलेल्या T.Y.B.Sc. (Sem-V & VI) (Choice Based), T.Y.B.Com. (Sem-V & VI) (Choice Based) या अभ्यासक्रमाच्या Applied Componants विषयांचे पुनर्मूल्यांकन महाविद्यालय स्तरावर करून पुनर्मूल्यांकनात प्राप्त गुणांची यादी **सॉफ्ट कॉपी (पेन ड्राइव) व हार्ड कॉपी स्वरूपात संबंधित परीक्षेचा निकाल जाहिर झाल्यापासून पुढील ३५ दिवसांच्या आत पुर्नमुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष, छत्रपती शिवाजी महाराज भवन, पहिला मजला, येथे स. ११.०० ते दु. ३.०० या कालावधीत हस्तेपोच सादर करावेत ही विनंती.**



Scanned with OKEN Scanner

वरील प्रमाणेचे अर्ज व गुणांच्या यादया नमुद केलेल्या कालावधी नंतर कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाही व याबाबत भविष्यात काही प्रशासकीय/तांत्रिक /न्यायालयीन बाब्री उद्भवल्यास यांस संबंधित महाविद्यालय जबाबदार राहिल.

या.परिपत्रकात नमुद असलेल्या अभ्यासक्रमांच्या परीक्षांव्यतिरिक्त इतर सर्व परीक्षांसाठीचे पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रतींसाठीचे अर्ज संबंधित परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यापासुन २० दिवसाच्या आत सॉफ्ट कॉपी(पेन ड्राइव) व हार्ड कॉपी (पारंपरिक अर्ज) स्वरूपात परिपुर्णरित्या भरून संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या सहीशिक्क्यानिशी विहित शुल्कासह परीक्षा विभागातील पुर्नमुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष, छत्रपती शिवाजी महाराज भवन, पहिला मजला, येथे स. ११.०० ते दु. ३.०० या कालावधीत हस्तेपोच सादर करावेत ही विनंती.

अर्ज सादर करण्यासाठीच्या विशेष महत्वाच्या सुचना:-

१) पुर्नमुल्याकंनाच्या अर्जासाठी पेन ड्राइव व स्वतंत्र पत्र तसेच छायांकित प्रतीच्या अर्जांसाठी पेन ड्राइव व स्वतंत्र पत्र सादर करावीत.

२) सदर दोन्ही बाबी एकाच पत्र असल्यास अर्ज स्विकारले जाणार नाही.

३) अर्ज परिपुर्णरित्या व अचूक भरलेले आहे याची खात्री करून घ्यावी. अर्ज अपुर्ण भरलेला व अर्जात चूकीची माहिती असल्यास व यामुळे भविष्यात कोणत्याही बाबी उद्भवल्यास त्यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील.

४) अर्ज स्वीकारण्याची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत अर्ज स्विकारले जाणार नाहीत.
उपरोक्त दोन्ही (Online / Offline) पद्धतीसाठीचा शुल्काचा तपशील:-

| | खुल्या प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी | राखीव प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी (Those who get concession in tution fees and other fees) |
|---|---|---|
| अर्ज शुल्क :- | रू. १०/- | रू. १०/- |
| पुर्नमुल्यांकन शुल्क :- | रू. २५०/- | रू. १२५/- |
| छायांकित प्रत शुल्क :- | रू. ५०/- | रू. २५/- |

तरी उपरोक्त बाबीची सर्व संबंधितांनी नोंद घेऊन सर्व संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून दयाव्यात.

(डॉ. प्रसाद कारंडे)
प्रभारी संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

स्थळ : मुंबई
दिनांक : २ जून, २०२३

अ. प्रत:-

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित/स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे सं चालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक व विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठांणे व कल्याण परिक्षेत्राचे समन्वयक/संचालक.

ब. प्रत माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित:-

१. केंद्रीय संगणक सुविधा विभागातील सर्व अधिकारी वर्ग
२. सर्व उपकुलसचिव, मुंबई विद्यापीठ
३. सर्व सहायक कुलसचिव, मुंबई विद्यापीठ

क. प्रत माहितीसाठी अग्रेषित:-

१. मा. संचालक विद्यार्थी कल्याण विभाग
२. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव
३. मा. प्र. कुलगुरू यांचे स्विय सहायक
४. मा. कुलसचिव, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ व वित्त व लेखा अधिकारी यांचे स्विय सहायक



Scanned with OKEN Scanner